Estd.1962
NAAC 'A' Grade

**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**
**परिपत्रक**
**श्रेणी सुधारणा मार्च/एप्रिल – 2020 च्या परीक्षा अर्जाबाबत**

मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक 26 ऑगस्ट, 2020 रोजी दिलेल्या आदेशानुसार व त्या अनुषंगाने मा. कुलपती तथा राज्यपाल व महाराष्ट्र शासनाने दिनांक 03 सप्टेंबर, 2020 रोजी सूचित केल्याप्रमाणे अंतिम वर्ष / अंतिम सत्रासाठी प्रवेशित असणा–या सर्व अभ्यासक्रमांच्या लेखी परीक्षा आयोजना बाबत अधिकार मंडळांनी मान्यता दिलेली असल्याने त्यांच्या मार्गदर्शक तत्वांनुसार अंतिम वर्ष / सत्राच्या सर्व अभ्यासक्रमामधील विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे आयोजन करण्यात येणार आहे.

1.श्रेणी सुधारणा ही परीक्षा अंतिम वर्षासाठीच घेण्यात येत असल्याने मार्च/एप्रिल – 2020 मध्ये ज्या विद्यार्थ्यांनी श्रेणी सुधारणा करण्यासाठी परीक्षा अर्ज विद्यापीठाकडे सादर केलेला आहे त्यांची परीक्षा अंतिम वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांसोबतच घेण्यात येतील.

2.त्याचे आयोजन सर्व संबंधित महाविद्यालयाने / अधिविभागाने अंतिम सत्राच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेसोबत करावयाचे आहे.

3.तसेच अशा विद्यार्थ्यांचा परीक्षा अर्ज सिस्टीममध्ये फिड करून घेवून त्यांना स्वतंत्र बैठक क्र. आलेला आहे याची खातरजमा महाविद्यालयांनी / अधिविभागांनी करून घ्यावयाची आहे.

4.तसेच अशा सर्व विद्यार्थ्यांचे ई–मेल आय.डी. व मोबाईल क्र. सिस्टीममध्ये फिड करून घेण्यासाठी विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडे सत्वर संपर्क साधावा.

5.श्रेणी सुधारणेसाठी असणारे विद्यापीठाचे पत्र क्र. SU/Exam/OE-2/834, दिनांक 09/02/2018 चे सर्व नियम लागु राहतील याची नोंद घ्यावी.

प्र.संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**संदर्भ** – शिवाजी वि./ अभि. आणि तंत्र परीक्षा विभाग/ 175
**दिनांक** – 03 OCT 2020
**प्रति,**

1. मा. अधिविभागप्रमुख / समन्वयक विद्यापीठातील सर्व अधिविभाग
2. मा. प्राचार्य,/मा. संचालक सर्व संलग्नीत महाविद्यालये/ संस्था
3. मा. संचालक, दूरशिक्षण केंद्र
4. मा. प्र. संचालिका, संगणक केंद्र
5. परीक्षक नियुक्ती विभाग,
6. उपकुलसचिव, सहा. कुलसचिव परीक्षा विभाग
7. समन्वयक, इंटरनेट कक्ष – संकेतस्थळावर प्रसिध्दी साठी

परीक्षा विभाग – बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., इतर परीक्षा – 1,2,3

**श्रेणी सुधारणा मार्च/एप्रिल – 2020 च्या परीक्षेसाठीच्या विद्यार्थ्यांचे** ई–मेल आय.डी. व मोबाईल क्र. सिस्टीममध्ये फिड करून घेण्यासाठी संबंधित परीक्षा विभागाकडे खालील नमुन्यामध्ये पाठविण्यात यावेत.

| Sr.No. | PRN | Student Name | Class | Sem | Mobile No. | E.Mail ID |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |